कै. श्री. बी.जी. देशमुख वार्षिक निबंध स्पर्धा २०२२-२३

विषय : महाराष्ट्रातील नागरी प्रशासनात झालेले बदल व आव्हाने

महाराष्ट्राचे देशातील स्थान



मध्ययुगीन महाराष्ट्र प्रदेश

महाराष्ट्रातील नागरी प्रशासनात झालेले बदल व आव्हाने

ओळख :

'महाराष्ट्र राज्य' याबद्दल विचार करतांना सर्वप्रथम या राज्याचे देशातील स्थान विचारात घ्यावे लागते भारतीय उपखंडातील (भारत, पाकिस्तान, भूतान, नेपाल, बांगलादेश व श्रीलंका समाविष्ट) भार देशातील विशाल भुमीतील २९ राज्ये व ७ केंद्रशासीत प्रदेशांपैकी 'महाराष्ट्र राज्य' हे एक प्रमुख राज आहे.

भौगोलिक स्थान :

भौगोलिक दृष्ट्या पाहता भारताच्या साधारणत: पश्चिम मध्यवर्ती भागात असलेले व उत्तर भारत व दक्षि भारत यांना जोडणरी विशाल भुमी म्हणजेच 'महाराष्ट्र राज्य' आहे.

प्रशासनातील ताजा/प्राथमिक बदल..

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर १९५६ मधे भाषावार प्रांतरचना स्विकारून पुनर्रचना करतांना, हैद्राबाद संस्थानातील मराठी भाषिक असलेले पाच जिल्हे (औरंगाबाद, बीड, परभणी, उस्मानाबाद व नांदेड) व मध्य प्रांतातील (C.P. & Berar) विदर्भाचे मराठी भाषिक आठ जिल्हे (बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, नागपूर भंडारा, यवतमाळा व चांदा) व बॉंबे प्रेसिडेंसी मधील १३ जिल्हे असे २६ जिल्हे व गुजरात यांचे मिळू १ नोव्हेंबर १९५६ रोजी द्वैभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली.

परंतू मराठी भाषिकांचे स्वतंत्र राज्य असावे अशी मागणी वाढत गेल्यामुळे त्यावेळच्या द्वैभाषि राज्यामध्ये आंदोलने झाली व मराठी भाषिकांचे (गुजरात वगळून) २६ जिल्हे असणारे महाराष्ट्र हे स्वतं राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. प्रशासनातील हा ताजा बदल दृष्टीस पडतोच.

विस्तार :-

महाराष्ट्र राज्याची पश्चिम-पूर्व लांबी जास्तीत जास्त ८०० किमी, व दक्षिणोत्तर लांबी जास्तीत जास ६०० किमी आहे व ७२० किमी चा समुद्रकिनारा लाभला आहे.

क्षेत्रफळ :-

राज्याचे एकुण क्षेत्रफळ ३,०७,७१३ चौ. किमी आहे व राजस्थान व मध्यप्रदेशानंतर क्षेत्रफळात तीस क्रमांक लागतो व भारताच्या एकुण क्षेत्रफळापैकी ९.३६% क्षेत्रफळ महाराष्ट्राने व्यापले आहे.



इ.स. १४००
मधील महाराष्ट्र प्रदेश

not to scale

मराठा साम्राज्य
१६६४-१७६०

इतिहास :-

आजचा महाराष्ट्र हा १९६० पूर्वी वेगवेगळ्या प्रांतामधे विखुरलेला होता व राजकिय व प्रशासकिय दृष्ट्या खऱ्या अर्थाने १ मे १९६० रोजी अस्तित्वात आला व या राज्यास पूर्वी दंडकारण्य, गोंडवन व विदर्भ या भागांत विस्तारलेला होता व फार मोठी ऐतिहासीक, राजकिय, सांस्कृतिक व सामाजिक परंपरा आहे.

इतिहास कालीन प्रशासन :-

महाराष्ट्र राज्य हे भारताचाचा भाग असल्यामुळे मध्ययुगीन इतिहास काळात डोकावले असता, मुघल काळात राजा तोडरमलने आधुनिक प्रशासनाचा पाया रचला असे म्हणावे लागेल. राजा तोडरमलने विशिष्ट नियमाचे आधारे जमिनीचे सर्वेक्षण व मोजणी करून राज्यकारभारासाठी शाश्वत उत्पन्नाचा प्रमुख स्त्रोत महसुल कर ठेवला. (दहसाला पद्धती इ.स. १५८०).

प्रांतिय शासन :-

मध्ययुगीन काळात महाराष्ट्राचा प्रदेश हा आदिलशाही व निजामशाहीच्या ताब्यात होता व सीमा सतत बदलत राहात होत्या. तरीपण प्रशासनाचा विचार केल्यास प्रांतिय शासनात पुढील प्रमाणे रचना होती:

१) **सुभेदार :-** प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे, जमीन महसुल जमा करणे, केंद्रीय सत्तेच्या शाही फार्मानांची अंमलबजावणी व शेतकऱ्यांना धान्य उत्पादनासाठी उत्तेजन देणे.

२) **दिवाण :-** प्रांतातील शासनाची संपूर्ण माहिती केंद्र सरकारला देणे, जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे, परगण्यातील प्रशासकीय सेवेत नेमलेल्या आमिलांच्या कार्यावर देखरेख ठेवणे इ.

३) **सद्र आणि काझी :-** हि पदे एकाच व्यक्तिकडे होती व प्रांतातील न्याय व्यवस्थेवर व सरकार (जिल्हा) मधील न्याय व्यवस्थेवर देखरेख ठेवणे हे कार्य होते.

४) **बक्षी :-** प्रांतातील सैन्यभरती, सैन्य संगठन व सैन्य व्यवस्था याची जबाबदारी या अधिकाऱ्यावर होती.

५) **फौजदार :-** प्रांतामधे शांतता व सुव्यवस्था राखणे प्रत्येक फौजदारावर एका सरकारची (जिल्हा) जबाबदारी असे.

इ.स. १८१५ मधील मराठा साम्राज्य विस्तार

स्थानिय प्रशासन :-

प्रांताचे सरकारात (जिल्ह्यात) विभाजन करून पुढील प्रमाणे अधिकारी रचना होती. (१) **फौजदार :-** जिल्ह्यातील फौजदार हा प्रमुख लष्करी अधिकारी असुन शांतता व सुव्यवस्था राखणे हे कर्तव्य होते. **(२) कोतवाल :-** सरकारातील (जिल्हा) रस्ते व बाजारपेठा सुरक्षित ठेवणे, व्यापाऱ्यांच्या वजन व मापे यावर देखरेख व नियंत्रण व्यक्तिंची व घरांची नोंद ठेवणे, रात्री गस्त घालणे इ. **(३) अंमलगुजार :-** जमीन महसुलाची वसुली शेतकऱ्यांना उत्तम प्रतिचे बी-बियाणे पुरवणे, जमा खर्चाचा अहवाल ठेवणे. **(४) बितिकची :-** अंमलगुजारचा सहाय्यक म्हणुन हा काम पाहायचा. शेतसारा, नांगरटीची जमीन, पडीत जमीन, सरकारी जमीन, खेड्याची मर्यादा याची संपूर्ण नोंद ठेवणे. प्रत्येक खेड्यातील जमीन महसूल गोळा करणे व शेतमालाच्या उत्पन्नाच्या दहा वर्षाचा सरासरी उत्पन्न नोंद कळवणे इ. **(५) खजिनदार :-** सरकार (जिल्हा) मधील जमा झालेले सर्व उत्पन्न केंद्राकडे पाठवणे हे खजिनदाराचे मुख्य कार्य होते.

परगणा (तालुका) :-

सरकार (जिल्हा) खालील विभाग हा परगणा म्हणजेच तालूका होय व यात पुढील प्रमाणे अधिकारी असत - (१) शिकदार (२) आमिल (३) पोतदार व (४) कानुनगो

त्यानंतर प्रशासनाचा (लोक प्रशासन व नागरी) महत्वाचा टप्पा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांचा काळाच्या पुढे असलेले, आधुनिक प्रशासनाची वीज असलेले प्रशासन होय. त्यांच्या लोक प्रशासनाची दोन मुख्य ध्येये होती - एक रयतेच्या सुख दुःखाशी समरस होणे व दुसरे जुलमी प्रशासन म्हणजेच वतनदारी पद्धती नष्ट करणे, हे प्रशासनातील आमुलाग्र बदल होय. छत्रपती शिवाजी महाराज केवळ आठ प्रधानांद्वारे राज्यकारभार चालवला जे सुटसुटीत होते व तेवढेच गतिमान व प्रभावी होते. प्रशासनातील महाराजांची दृष्टी आजही स्वीकार्य आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यातील महाराष्ट्राचे प्रशासन थोडक्या पुढील प्रमाणे होते -

अष्टप्रधान मंडळ, त्यांच्या कार्यालयातील दरकदार, शिवरायांच्या सचिवालयातील अधिकारी व कारकुन मिळून दौलत किंवा प्रशासन होत असे.

इ.स. १७९५ मधील महाराष्ट्र प्रदेश

त्याकाळी स्वराज्याचे/महाराष्ट्राचे विभाजन तीन प्रांतात केले व प्रत्येक प्रांताची जबाबदारी अष्टप्रधान मंडळातील तीन प्रधानांवर होती, हेच प्रधान प्रांतीय प्रशासन व्यवस्थेत राजांचे प्रतिनिधी होते. प्रधानाला प्रांताचे सुभेदार नेमणुक असे.

सुभेदाराचे मदतीस मुजुमदार, कारकुन, चिटणीस, सभासद, सबनीस व पोतनीस असत.

परगण्यातील जमीन महसुलाची वसुली सुभेदार व त्याचे अधिकारी करीत जे वंशपरंपरेने देशमुख व देशपांडे असत.

नियत शेतसारा वसुल करून दिवाण कचेरीत जमा करणे हे देशमुखाचे मुख्य काम व देशपांडे सर्व हिशोबाचे व दप्तराचे काम पाहील गाव पातळीवर पाटील, कुलकर्णी व चौगुला हे वतनदार ग्रामाधिकारी होते.

गरजेनुसार शेतसारा, अर्थसहाय्य व सुव्यवस्था हे स्वराज्यकालीन महाराष्ट्राचे वैशिष्टे होते.

नंतर भारतातील पर्यायाने महाराष्ट्रातील प्रशासन व नोकर शाहीचा पाया ब्रिटीश कालखंड सन १८७२ साली जिल्हाधिकारी व कलेक्टर यांच्या पदनिर्मिती पासून सुरू झाला.

संक्षेपाने विवेचन करायचे तर असे म्हणता येईल कि ब्रिटीशकाळात त्रिस्तरीय प्रशासन प्रणाली - (१) केंद्रीय सरकार (२) प्रांतिक सरकार व (३) स्थानिक स्वराज्य संस्था अशी रचना केली व त्यामुळे अधिकाराचे विकेंद्रीकरण झाले व पुढे स्वातंत्र्यानंतर प्रशासनाची हिच पद्धत अवलंबन केल्या गेली.

पंचायती राज :-

देशातील/राज्यातील पंचायती राज व्यवस्था हि 'बलवंतराय मेहता' समिती (१९५७) चे शिफरसीनुसार सुरू झाली. यामध्ये 'त्रिस्तरीय ग्राम प्रशासन व्यवस्था स्विकाल्या गेली जसे :- (१) ग्राम पंचायत (२) पंचायत समिती (३) जिल्हा परिषद.

ग्रामपंचायत :-

महाराष्ट्रात मुंबई ग्रामपंचायत कायदा १९५८ कलम-५ नुसार २ ऑक्टोबर १९५८ रोजी ग्रामपंचायतीची निर्मिती झाली. कलम-५ अनुसार प्रत्येक खेड्यासाठी एक ग्रामपंचायत आहे. काहीवेळी दोन-तीन छोट्या गावांची मिळून ग्राम पंचायत स्थापन होते. त्यास 'गट ग्रामपंचायत' म्हणतात.

बदल :- ७३ व्या घटना दुरूस्तीत सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र सरकारने मुंबई ग्रामपंचायत महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती दुरूस्ती विधेयक नावाचा कायदा २२ एप्रिल १९९४ रोजी केला,



मुंबई इलाखा १८६२-१९३७

त्यानुसार ग्रामपंचायतीच्या कारभारात पुढील प्रमाणे स्थित्यंतरे व अधिकार व वैशिष्ट्ये ठरली.

* ग्रामपंचायतीचा कार्यकाल ५ वर्षे असतो.

* ग्रामपंचायतीमध्ये इतर मागासवर्गीयांसाठी २७% जागा राखीव

* ग्रामपंचायतीमध्ये १/२ जागा स्त्रियांसाठी राखीव असतात.

* सरपंचाची निवड ग्रामपंचायत सदस्यांकडुन होते.

* ग्रामपंचायतीचा सचिव व प्रशासकीय अधिकारी हा ग्रामसेवक असतो, ज्याची नेमणुक जिल्हा परिषद करते.

नवा बदल : आता विविध आरक्षणाचे अधिन राहुन सरपंचाची निवड थेट जनतेतून केली जाईल (महा. शासन अध्यादेश क्र. ५, सन २०२२)

* ग्रामपंचायतीचे उत्पन्न तीन प्रकारे मिळतो :-

(१) सरकारी अनुदान (२) करवसुली (३) प्रत्यक्ष कर, अप्रत्यक्ष फी 'सेस' इत्यादी.

ग्रामपंचायत संख्येतील बदल

वर्ष १९६१	२१,६३६ ग्रा.पं.
वर्ष २००४-०५	२७,९४६ ग्रा.पं.
वर्ष २०२२	२८,८१३ ग्रा.पं.

पंचायत समिती :-

महाराष्ट्रात तालुका स्तरावरील पंचायत राज पद्धतीला 'पंचायत समिती' म्हणतात, पंचायत समिती हि जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांना जोडणारा दुवा असुन कार्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(१) विकास व इतर योजनांची आखणी करणे व जिल्हा परिषदेच्या अनुमतीने त्यांची अंमलबजावणी करणे (२) जिल्हा परिषदेने सोपवलेली कार्ये पार पाडणे (३) ग्रामपंचायतीच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण व मार्गदर्शन.

तालुका पंचायत समिती विकास कार्यात जनसहभाग घडविणारी संख्या आहे व कार्यकाळ ५ वर्षे असतो.

पंचायत समितीचा प्रमुख गट विकास अधिकारी (बी.डी.ओ.) असतो. पंचायत समिती एकुण ७४ विषय हाताळते. तिच्या प्रशासन यंत्रणेची विभागणी सात भागात आहे :-

मुंबई प्रांत १९३७-१९४५

:- (१) सर्वसाधारण प्रशासन (२) लेखा (३) सार्वजनिक बांधकाम (४) शेती (५) आरोग्य (६) शिक्षण (७) समाजकल्याण

पंचायत समिती संख्येत झालेले वर्षनिहाय बदल

वर्ष	पंचायत समिती संख्या
१९६१	२९५
२०००	३२०
२००५-०६	३४९
२०२२	३५१

जिल्हा परिषद :-

त्रिस्तरीय पंचायतराज पद्धती मधील तिसरा टप्पा म्हणजेच 'जिल्हा परिषद' होय. महाराष्ट्रात जिल्हा परिषदांची निर्मिती जिल्हा परिषद व पंचायत समिती कायदा १९६१ नुसार १ मे १९६२ रोजी झाली व प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हा परिषद स्थापन झाली.

महाराष्ट्रात जिल्हा परिषदेची पहिल्यांदा निवडणूक १९६५ रोजी झाली.

जिल्हा परिषदेची रचना :

१) सामान्यत: ३५००० लोकसंख्येसाठी एक याप्रमाणे निवडलेले ५० ते ६५ सभासद असतात.

२) आरक्षणाप्रमाणे राखीव जागा असतात.

३) कार्यकाल ५ वर्षे

४) सध्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाळ २ वर्षे ६ महिने आहे.

५) जिल्हा परिषदेची एक स्थायी समिती व पुढील विषय समित्या असतात. (अ) वित्त समिती (ब) कार्य समिती (क) कृषी समिती (ड) समाजकल्याण समिती (इ) शिक्षण समिती (फ) आरोग्य समिती (ग) पशुसंवर्धन व दुग्धशाळा समिती (ह) महिला व बालकल्याण समिती (च) जलसंधारण व पाणी पुरवठा समिती.

जिल्हा परिषदेची कार्ये :-

जिल्हा परिषद कायद्यात निरनिराळ्या क्षेत्रातील १२८ विषयांचा व कामांचा उल्लेख आहे जसे -

(१) शेतकऱ्यांना सुधारीत बी-बीयाणे पुरवते. (२) शेतीच्या नवनवीन पद्धतीची माहिती शेतकऱ्यांना देणे

द्विभाषिक मुंबई राज्य १९५६-१९६०

(३) लघु पाटबंधारे व पाझर तलावाचे बांधकाम करणे (४) कुरण व चराऊ रानांची देखभाल (५) सर्वांना शिक्षणासाठी शाळा उघडणे (६) प्रौढ साक्षर व वाचनालय (७) प्राथमिक आरोग्य (८) गावागावांतील रस्ते व पुल तयार करणे (९) दवाखाने व शाळा यांचे इमारती बांधणे (१०) अनुसुचित जाती व जमाती यांचे विकासाचे कार्यक्रम राबवणे. आदिवासीसाठी आश्रमशाळा व अनुसुचित जातीच्या विद्यार्थांसाठी मोफत वसतीगृहे चालवणे (११) छोटे उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन देणे, त्यात कुटीरोद्योग, कुक्कुट पालन, शेळी पालन, हस्तोद्योग, दुग्धशाळा, शेतमालावर प्रक्रिया करणाऱ्या गिरण्या, यांचा समावेश होतो.

जिल्हा परिषद संख्या व वर्षनिहाय बदल	
वर्ष १९६१	२५
वर्ष २००२	२७
वर्ष २०२२	३४

जिल्हा परिषदेचे उत्पन्न व साधने :-

जिल्हा परिषदेचे उत्पन्न व साधने पुढील प्रमाणे आहे :-

१) राज्य सरकार प्रत्येक जिल्हा परिषदेला जिल्ह्याच्या विकासाला ७५% अनुदान देते.

२) राज्य शासन एकुण जमिनीच्या ७०% रक्कम परिषदेस देणे, शासन कर्मचाऱ्यांसाठी ७५% अनुदान.

३) शेतसाऱ्यावर, व्यवसाय करावर, पाणीपट्टी, मनोरंजन, यात्राकर, दलाली व अडते यांच्यावरील फी.

महसुल प्रशासन :

* १ मे १९६० रोजी स्थापना झालेल्या महाराष्ट्रात २६ जिल्हे व ४ महसुल विभाग तयार करण्यात आले होते.

* १ फेब्रु. १९८१ रोजी विभागीय आयुक्तांना विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करता यावी यासाठी पुढील सहा महसुली विभाग निर्माण केल्या गेले.

* प्रशासकीय विभाग :- प्रशासकीय सोयीसाठी महाराष्ट्राची विभागणी सहा प्रशासकीय भागात केली आहे. (१) कोकण (२) औरंगाबाद (३) पुणे (४) नाशिक (५) नागपूर (६) अमरावती.


नदुरबार
भंडारा
गोंदिया
धुळे
जळगाव
अमरावती
नागपूर
अकोला
वर्धा
बुलढाणा
नाशिक
वाशिम
यवतमाळ
चंद्रपूर
पालघर
औरंगाबाद
मुंबई उपनगर
ठाणे
जालना
अहमदनगर
परभणी
हिंगोली
गडचिरोली
मुंबई शहर
बीड
नांदेड
पुणे
रायगड
लातूर
उस्मानाबाद
सातारा
सोलापूर
रत्नागिरी
सांगली
कोल्हापूर
सिंधुदुर्ग

आजचा महाराष्ट्र

भौगोलिक विभागाचे नाव :

	मुख्यमंत्री	अ.क्र.	विभागाचे नाव	समाविष्ट शहरे/जिल्हे	समाविष्ट तालुका एकुण	तालुका
कोकण	मुंबई	१)	कोकण व रायगड	मुंबई शहर, पालघर, ठाणे मुंबई उपनगर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग	५०	३०७२८ चौ.कि.मी
खान्देश	नाशिक	२)	नाशिक	नाशिक, जळगाव, अहमदनगर, धुळे, नंदुरबार	५४	५७४९३ चौ.कि.मी
पश्चिम महाराष्ट्र	पुणे	३)	पुणे	पुणे, सातारा, सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर	५८	५७२७५ चौ.कि.मी
मराठवाडा	औरंगाबाद	४)	औरंगाबाद, परभणी, हिंगोली	औरंगाबाद, बीड, जालना, लातूर, नांदेड, उस्मानाबाद	७६	६४८१३ चौ.कि.मी
विदर्भ	अमरावती	५)	अमरावती	अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ	५६	४६०२७ चौ.कि.मी
विदर्भ	नागपूर	६)	नागपूर	नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया व भंडारा	६४	५१३७७ चौ.कि.मी

* १९८१ मधे रत्नागिरी जिल्ह्याचे विभाजन होऊन 'सिंधुदुर्ग' हा नवीन जिल्हा निर्माण झाला.

* १९८२ साली उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन करून उस्मानाबाद व 'लातूर' असे दोन जिल्हे निर्माण झाले.

* १९८२ साली चंद्रपूर जिल्ह्याचे चंद्रपूर व 'गडचिरोली' असे विभाजन झाले.

* १२ ऑगस्ट १९९७ रोजी अकोला जिल्ह्याचे विभाजन करून नवीन 'वाशिम' जिल्हा निर्मितीचा निर्णय राज्य मंत्रीमंडळाने घेतला.

* धुळे जिल्ह्याचे विभाजन करून 'नंदुरबार' हा नवा जिल्हा १८ जुन १९९८ मधे घेण्यात आला.

* १ जुन १९९९ पासून भंडारा जिल्ह्याचे विभाजन होऊन 'गोंदिया' व परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन 'हिंगोली' हा नवीन जिल्हा निर्माण करण्यात आला.

याप्रमाणे सहा सहा महसुली विभागात (१ फेब्रु. १९८१) वरील जिल्हे विभाजीत झाल्याप्रमाणे विभागनिहाय जिल्ह्यांची वाढ झाली.

आव्हाने :-

* प्रशासकिय दृष्ट्या महाराष्ट्रात कोणते नवीन जिल्हे होणे आवश्यक आहे. राज्यात १९८८ नंतर १० जिल्ह्यांची निर्मिती करण्यात आली. सध्या महाराष्ट्रात ३६ जिल्हे व ३५५ तालुके आहेत. मात्र अस्तीत्वात असलेली व काही तालुक्यांची ठिकाणे भौगोलिक दृष्ट्या व प्रशासकीय दृष्ट्या गैरसोयीचे ठरत आहे. कुठे दुर्गम भागात प्रशासन योग्यरित्या काम करू शकत नाही किंवा जास्त लोकसंख्या, जिल्ह्याचे ठिकाण लांब असणे किंवा राजकीय स्वार्थासाठी मागिल अनेक वर्षापासून १८ जिल्ह्यांचे विभाजन करून नवीन २२ जिल्हे बनविण्याची मागणी केली जात आहे.

* बुलढाणा - खामगाव
* यवतमाळ - पुसद
* अमरावती - अचलपूर
* भंडारा - साकोली
* चंद्रपूर - चिमुर
* गडचिरोली - अहेरी
* जळगाव - भुसावळ
* लातूर - उद्‌गीर
* बीड - अंबेजोगाई
* नांदेड - किनवट
* अहमदनगर - शिर्डी, संगमनेर, श्रीरामपूर
* नाशिक - मालेगाव, कळवण
* सातारा - माणदेश
* पुणे - शिवनेरी
* पालघर - जव्हार
* ठाणे - मीरा भाईंदर, कल्याण
* रत्नागिरी - मानगड
* रायगड - महाड

* नांदेड हा प्रशासकीय विभाग बनवावा अशी मागणी आहे.

* महाराष्ट्र राज्याचे विभाजन करून 'विदर्भ राज्य' वेगळे बनवावे अशी सुद्धा मागणी आहे.

जिल्ह्यांचे विकेंद्रीकरण लोकांना सक्षम करते, लहान जिल्हे प्रशासनास सुलभ, कार्यकुशल बनवते, परंतु या मागण्या एक आव्हान ठरतात.

जिल्हा प्रशासन :-

राज्य कारभारासाठी सोयीसाठी, महाराष्ट्राची विभागणी अनेक जिल्ह्यात (एकुण ३६) विभागणी केली आहे. राज्य शासनाची कामे जिल्ह्याच्या क्षेत्रात पार पाडण्यासाठी जी यंत्रणा असते त्यास 'जिल्ह्याचे प्रशासन' म्हणतात.

राज्य सरकार, स्थानिक संस्था व जनता यांच्यातील दुवा म्हणून जिल्ह्याचे प्रशासन काम करते. जिल्हा प्रशासनात प्रमुखपदी जिल्हाधिकारी, त्यानंतर उपजिल्हाधिकारी व तद्नंतर तहसिलदार अशी रचना असते.

कार्ये :- (अ) जिल्हाधिकारी :- (१) जिल्हा दंडाधिकारी (महसुल गोळा करणे), जिल्हा निवडणुक अधिकारी व जनगणना अधिकारी, जिल्ह्यातील सर्व घडामोडींची सरकारला माहिती देणे, पुर, दुष्काळ किंवा भुकंप यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये नागरीकांना सर्व प्रकारची मदत करणे. (२) कायदा व सुव्यवस्था राखणे. (३) नागरी सुविधा पुरविणे (४) विकासकार्ये अंमलबजावणी (५) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण.

(ब) उपजिल्हाधिकारी किंवा प्रांत अधिकारी :- कार्यक्षेत्र = उपविभाग

कार्ये :- (१) महसुल कार्यासंबंधात जिल्हाधिकारी व तहसिलदार यांच्यात समन्वय साधणे (२) उपविभागात कायदा व सुव्यवस्था सांभाळणे (३) सरकारी आदेशाची अंमलबजावणी (४) दुष्काळ प्रसंगी जनतेस महसुलात सुट देण्याची शिफारस

(क) तहसिलदार :- प्रत्येक तालुक्यास एक तहसिलदार नियुक्त असतो.

कार्ये :- (१) तालुक्यात दंडाधिकारी, कायदा व सुव्यवस्था कायम ठरते. (२) मंडल अधिकारी व तलाठी यांचेवर नियंत्रण (३) तालुक्यातील पिकपाण्याची आणेवारी कळविणे (४) कोतवाल नेमणुक (५) सर्व्हे नंबरच्या सरहद्दी ठरविणे, तात्पुरती लायसेंस देणे, कुटुंब कल्याण योजना राबविणे इत्यादी.

गावपातळीवरील महसुल प्रशासन :

तलाठी : तलाठी हा पूर्णकाळ शासकीय सेवक व ग्रामीण मुलकी प्रशासनातील महत्वाचा वर्ग-३ कर्मचारी आहे.

बदल : पूर्वी महाराष्ट्रात महसुल गोळा करण्यासाठी कुलकर्णी असायचे, त्याऐवजी सरकारी नोकर १८९२ चे कायद्याने नेमण्यात आले.

छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात १९१८ साली कुलकर्णी पदे रद्द करून पगारी तलाठी नेमले होते. यांचेवरती नियंत्रण मंडळ अधिकारी व तहसिलदार यांचे असते.

कार्ये : (१) नोंदणी पुस्तके, हिशेब, अभिलेख ठेवणे (२) तहसिलदार महसुल अधिकारी, पोलीस अधिकारी यांचे आदेशानुसार नोटीस, मरणोत्तर चौकशीचे प्रतिवृत्त, फौजदारी प्रकरणातील कामकाजा संबंधी कागदपत्रे तयार करणे (३) निवडणूक यंत्रणेतील कार्ये (४) महसुल, वसुली, गावाच्या नोंदीचे उत्तरे देणे, दुष्काळ निवारण, कुटुंबनियोजन कार्यक्रमाचे उपक्रम पार पाडणे (५) सातबारा, ८-अ उतारा देणे (६) जमिनीची पैसेवारी ठरवणे व त्याचा अहवाल तहसिलदारामार्फत शासनास पाठविणे इ.

कोतवाल :- कोतवालाची नेमणुक तहसिलदार करतात.

कार्ये :- (१) गावकऱ्यांना आवश्यक तेव्हा चावडी किंवा सज्जा येथे बोलावणे (२) गावाचे दफ्तर वरिष्ठ कार्यालयास नेणे व आणणे (३) जन्म, मृत्यु, विवाह इ. नोंदणीची माहिती ग्रामसेवकास देणे. (४) दवंडी पिटून सरकारी सुचना, आदेश जाहिर करणे, (५) तलाठी, पोलीस पाटील यांचे वरील अधिकाऱ्यांच्या कामात मदत करणे (६) गुन्ह्यासंबंधी माहिती पोलीस पाटलांना कळविणे.

बदल :-

महाराष्ट्र प्रशासनतील बदल :-

१) पंचायत राज त्रिस्तरीय केलेले आहे.

२) जिल्हा स्तरावर नियोजन व विकास मंडळ स्थापना करून शंभरपेक्षा अधिक योजना जिल्हास्तरावर राबविल्या आहेत.

३) भारतात सर्वप्रथम माहितीचा राज्यस्तरीय अधिकार कायदा केला.

४) महिला व क्रिडा धोरण नव्याने आखले.

५) लोक सहभागातून विकास कामांवर भर दिला गेला.

६) डि.पी.डी.सी. अंतर्गत जिल्हा विकासासाठी जिल्हासापेक्ष नाविन्यपूर्ण योजना आखल्या गेल्या.

७) स्वतंत्र सांस्कृतिक धोरण ठरविल्या गेले.

८) सर्वाधिक विकेंद्रीकरण व माहितीच्या अधिकाराचा सर्वात व्यापक वापर, यामुळे प्रशासनात बराच सुधार केला आहे.

९) पालकमंत्री व पालक सचिव यांचे माध्यमातून जिल्ह स्तरीय विकासाला चालना दिल्या गेली.

१०) विविध नद्यांचे म्हणजे कृष्णा, गोदावरी व तापी खोरे प्राधिकरण स्थापणा.

११) विकास कामांना गती देण्या बरोबर दर्जा राखण्यासाठी प्राधिकरणांची स्थापणा हा वैशिष्ट्यपूर्ण बदल.

उदा. (अ) एम.एम.आर.डी.ए. (ब) पी.एम.पी.एम.एस. (क) निगडी प्राधिकरण (ड) म्हाडा (इ) हाऊसिंग बोर्ड (फ) एम.एम.आर.डी.सी.

१२) लोकसहभागांतून विकासकामांना चालना मिळावी म्हणुन अनेक अभियान राबविले उदा.:- संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान, नगर स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्ती अभियान इ. यांनी देश व जगाचे लक्ष वेधुन घेतले.

१३) आदिवासी व अनुसुचित क्षेत्राचे रक्षणा करिता PESA कायदा लागु केला.

बदल : PESA कायदा १९९६

याचे इंग्रजीतील पूर्ण स्वरूप Panchayat Extension to Scheduled Areas (PESA) असे आहे व मराठी मधे पंचायत अनुसुचित क्षेत्र विस्तार कायदा असे आहे. हा कायदा मुख्यत: अनुसुचित भागात राहणाऱ्या आदिवासी लोकांचे स्वशासन संरक्षण करण्याकरिता वर्ष १९६६ मध्ये देशामध्ये लागु झाला. आंध्रप्रदेश, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, राजस्थान, ओडीसा, तेलंगाणा आणि मध्यप्रदेश सोबतच महाराष्ट्रात लागु झाला.

PESA ची वैशिष्ट्ये व उद्देश :- १) समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासी नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी, त्या भागाच्या सामाजिक, नैसर्गिक व भौगोलिक संपन्नतेसाठी केलेला कायदा असे म्हणता येईल.

२) आदिवासींची संस्कृती, प्रथा, परंपरा यांचे जतन व संवर्धन करून ग्रामसभेच्या माध्यमातुन स्वशासन व्यवस्था बळकत करणे.

३) संबंधित गावामध्ये एखादी योजना राबविणे, प्रकल्प हाती घेणे, शासनाच्या निधीचा विनियोग करणे, विविध योजनांसाठी लाभार्थी निवड, मादक द्रव्य विक्री किंवा सेवन प्रतिबंध यासाठी ग्रामसभेची मान्यता बंधनकारक करणे.

४) एखाद्या छोट्या वाडी वस्तीतील लोकांना गावाची स्वतंत्र गाव म्हणुन नोंद करावीशी वाटली तर ती सुविधा उपलब्ध करणे.

५) या कायद्याद्वारे आदिवासी भागातील नागरिकांना मिळालेला सर्वात महत्वाचा अधिकार म्हणजे त्यांच्या विविध प्रकारच्या नैसर्गिक संपत्तीबाबत तसेच जमिनीबाबत निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. (जलस्त्रोत, सिंचन, खनिजे, गौण वनोत्पादन).

६) अनुसुचित जमातीतील व्यक्तिंची कोणतीही जमीन बिगर आदिवासींकडे बेकायदेशीर हस्तांतरण होणार नाही याची सुनिश्चिती ग्रामसभा करेल.

७) महिला सक्षमीकरण व ग्रामसभेच्या विविध समित्यांवर ५०% स्त्रियांना प्रातिनिधित्व.

<u>महाराष्ट्र राज्यातील एकुण १३ जिल्हे यांना PESA कायदा लागु आहे</u> :-

(१) अहमदनगर (२) पुणे (३) ठाणे (४) पालघर (५) धुळे (६) नंदुरबार (७) नाशिक (८) जळगाव (९) अमरावती (१०) यवतमाळ (११) नांदेड (१२) चंद्रपूर (१३) गडचिरोली.

PESA कायद्यातील त्रुटी व आव्हाने :-

अ) आंशिक अंमलबजावणी Partial Implementation :- राष्ट्रीय कायद्यासोबत राज्य सरकार सम्मिलीत झाल्यामुळे पूर्णत: अंमल होऊ शकत नाही. एका जिल्ह्यात लागु करून त्या बाजुच्या जिल्ह्यातील एक लक्षणीय संख्या अप्रभावित राहते किंवा फायदा घेऊ शकत नाही.

ब) प्रशासकीय अडथळे :- तज्ञांचे मते, स्पष्टतेचा अभाव, कायदेशिर लवचिकपणा/अशक्तपणा, नोकरशाहीची उदासिनता, राजकिय इच्छा शक्तीचा अभाव, सत्तेतील मक्तेदारी सोडण्याच्या विरोध इ. मुळे PESA कायदा सर्वार्थाने व परिपूर्णरित्या अंमलबजावणी केला जात नाही.

आव्हाने :- **लोकसंख्या वाढ**

वर्ष	अंदाजे लोकसंख्या
१९६१	३ कोटी ९६ लाख
१९८५	६ कोटी ५० लाख
२००१	९ कोटी ६८ लाख
२०२२	१२ कोटी ५० लाख

महाराष्ट्रातील प्रशासना समोर प्रामुख्याने असलेली आव्हाने पुढील प्रमाणे आहेत.

१) लोकसंख्या वाढ

२) सातत्याने बदलणारे सरकारी धोरण व त्यामुळे येणारी प्रशासनातील खंडमय आलेख

३) दुष्काळ व पुरामुळे होणारे आकस्मिक संकट

४) सिंचनाचा अभाव / अपुरे महसुल

५) नोकर भरतीकडे शासनाचे दुर्लक्ष / अपुरा कर्मचारी वर्ग

६) इंग्रजी भाषेकडे वाढलेला कल / मराठीचा अपुरा वापर

७) शेतकरी आत्महत्या व प्रशासन निरूत्साही

८) जंगलतोड / वृक्षतोड

९) धार्मिक तेढ / जातीय तेढीमुळे होणाऱ्या जातीय दंगली

१०) वाहतुक / प्रदुषणामुळे होणाऱ्या नुकसानास प्रतिबंध करणे अशक्य

११) पोलीस संरक्षण / गुन्हेगारीला आळा लावण्यास अपयश

१२) ई-प्रशासन लागु करणे, राज्य प्रशासनाने येत्या १ एप्रिल पासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर प्रभावीपणे करण्याची घोषणा केली आहे. ई-ऑफिस प्रणालीमध्ये नागरीक व सरकारी कर्मचारी यांचा वेळ वाचणार आहे. निर्णय, पारदर्शीपणा यामध्ये परस्पर सामंजस्य मिळून दप्तर दिरंगाई टळणार आहे. हि योजना लागू करण्या करिता राज्य शासनासमोर एक आव्हाणच आहे.

१३) प्रशासनातील भ्रष्टाचार हे पूर्वीपासूनचे आव्हान प्रशासनासमोर असुन त्यावरील उपाययोजना व इच्छाशक्ती हे कालातीत ठरेल अशी आशा करूया.

१४) गडकिल्ल्यांचे संवर्धन व पर्यटणास चालना :-

महाराष्ट्राला लाभलेल्या जवळपास ३१७ गड, किल्ले व ऐतिहासिक वास्तु या महाराष्ट्राचे ऐतिहासिक वैभव आहे. परंतु बरेच गड हे Archeological Survey of India - ASI चे अखत्यारीत येत असल्यामुळे महाराष्ट्र राज्य हस्तक्षेप करू शकत नाही व त्यामुळे दिवसेंदिवस ढासळत आहेत. त्यादृष्टीने गडकिल्ल्यांना 'सांस्कृतिक पर्यटक क्षेत्र प्रकार' (Heritage Tourism Destination) असा दर्जा करून संवर्धन व सांस्कृतिक पर्यटन क्षेत्राचे अंमलाखाली करता येईल व अशी मागणी नागरिकांकडून वारंवार होते. प्रशासनाने याबाबत हौसी व इच्छुक नागरिक/संस्थेची मदत व सहभाग घेऊन यासाठी विशेष निधीची तरतुद करून आव्हान पेलणे शक्य आहे.

याप्रकारे महाराष्ट्र राज्य नागरी प्रशासन, त्यातील बदल व आव्हाने यांचा आढावा/उहापोह केलेला आहे.

लेखक - मॅक्सप्लेअर